**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /२६७२/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संजयकुमार गवळी | अधिक्षक<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>पुणे विभाग, पुणे | सहायक धर्मादाय आयुक्त-१<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>पुणे विभाग, पुणे |

**(सुनावणी दिनांक- ०२.०७.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.२४.०६.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये उडवाउडवीची उत्तरे दिलेली असून मान्य नाही, सुनावणी होऊनही आदेश केला नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २०.०२.२०२५ | १) मी ई-मेल द्वारे दि.२/२/२०२५ व ३/२/२०२५ रोजी कल्पतरू गणपती प्रतिष्ठान ट्रस्ट रजि नं ई ४६७९/पुणे बाबत तक्रार केली होती या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा तपशिल कारवाई केली नसेल तर त्यामागील कार्यालयाची अधिकृत भूमिका स्पष्ट करणारी माहिती, कल्पतरू गणपती प्रतिष्ठान ट्रस्ट या न्यासाची नोंदणी करतेवेळी विश्वस्तांनी दिलेली प्रतिज्ञापत्र अर्जातील ज्या बाबींची पडताळणी कार्यालयाने केली त्याची माहिती. सोबतच त्यावेळी केलेल्या कार्यालयीन कामकाजाच्या प्रति तसेच पुढील ३ मुद्यांची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, " दि. २०.०२.२०२५ चा अर्ज होता अपिल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांचे उत्तर आले चौकशी चालू आहे माहिती देता येत नाही." त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " कल्पतरु बाबत तक्रार केली आहे उत्तर दिले आहे आदेश झाला आहे. सदर प्रकरणाची चौकशी चालू आहे. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०५.२०२५ च्या पत्राने उत्तर दिल्याचे दिसनु येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०७.२०२५ च्या निर्णयामध्ये अपिल नामंजुर केल्याचे दिसुन येते.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त- १, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थींने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सत्वर नियमानुरुप चौकशी करुन आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस वस्तुनिष्ठ माहिती कलम ७(६) नुसार व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /२६७२/२०२५/पुणे 4332/2026 दिनांक - 23/9/2026.